# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जळगाव दि.२९ (            ) माझे कुटुंब माझी जबाबदारी या मोहिमेअंतर्गत गृहभेटीव्दारे कुटुंबाचा सर्व्हे या राज्यपातळीवरील सर्व्हेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थीनी गौतमी आनंद जगदेव हिने राज्यात चौथ्या क्रमांकाचे तर विद्यापीठ पातळीवर प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले आहे.

मुख्यमंत्र्यांचे सल्लागार डॉ.दीपक म्हैसेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या राज्य शासनाच्या माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मंत्रालय, मुंबई, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्ट आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने गृहभेटीव्दारे कुटुंबाचा सर्व्हे अशी स्पर्धा घेण्यात आली. जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने झालेल्या या स्पर्धेत झेड.बी.पाटील महाविद्यालयाची रासेयोची विद्यार्थीनी गौतमी जगदेव हिने भाग घेतला. गौतमीने निकीता साबरे हिच्या मदतीने ४२९ घरांचे ३० प्रश्नांच्या प्रश्नावलीव्दारे सर्वेक्षण केले. तसेच घरातील प्रत्येकाच्या शरीराचे तापमान तपासले. या शिवाय कोरोनाला सामोरे जात असतांना कुटुंबाची जबाबदारी कशी पार पाडावी याचेही मार्गदर्शन केले. या स्पर्धेत गौतमीने राज्यात चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. तिला महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रशांत कसबे यांनी मार्गदर्शन केले. याच स्पर्धेत विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाचा रासेयोचा विद्यार्थी आकाश धनगर याने अकरावे, अक्कलकुवा येथील विज्ञान महाविद्यालयाचा रासेयो स्वयंसेवक दीपक पाडवी याने पंधरावे आणि एरंडोल महाविद्यालयाची रासेयो स्वयंसेविका हर्षाली धनगर हिने एकोणावीसवे स्थान प्राप्त केले. या स्वयंसेवकांनाही पुरस्कार प्राप्त झाले आहे. या यशाबददल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा. पी.पी.माहुलीकर, राज्य संपर्क अधिकारी डॉ.अतुल साळुंखे, क्षेत्रीय संचालक श्री.कार्तिकेन, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, रासेयो संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे, प्राचार्य पी.एच.पवार आदींनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०२०                                        दिनांक : २९.१०. २०२०

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी